

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

परळी संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in

9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 271 | सोमवार दि. 09 नोव्हेंबर 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

ना. पंकजाताई मुंडेंची यंदाची भाऊबीज ऊसतोड कामगार व शेतकऱ्यांसोबत

दुष्काळ, ऊसतोड कामगारांचे दुःख आणि तरुण ऊसतोड कामगाराच्या अपघाती मृत्यूने मन हेलावले

बीड दि. 08 -सध्याची दुष्काळी परिस्थिती ऊसतोड कामगारांचे दुःख आणि ऐन दिवाळीत सकाळी सकाळी मतदारसंघातील ऊसतोड तरुणाच्या अपघाती मृत्यूची आलेली बातमी ऐकून आपण व्यथित झालो. यंदाची भाऊबीज ऊसतोड कामगार आणि शेतकऱ्यांसोबत साजरी करत त्यांचे कष्ट वाटून घेण्याचा मनोदय राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला आहेत.

ना. पंकजाताई मुंडे यांनी समाज माध्यमावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्या म्हणाल्या, माझ्या मतदारसंघातील एका 22 वर्षीय तरुणाचा ऊसतोडणीसाठी गेलेला असताना अपघाती मृत्यू झाल्याची बातमी सकाळी सहा वाजता मिळाली आणि या घटनेने मन सुन्न झाले. त्या तरुणाच्या आयुष्यात कितीतरी स्वप्ने होती, त्याच्या कुटुंबाला त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, एका अपघाताने सारे काही हिरावून घेतले. या घटनेने ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांचे दुःख आणि त्यांच्यासमोरील संघर्ष पुन्हा एकदा प्रकर्षाने जाणवला. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अगोदरच मन उदास आहे. त्यातच मन सुन्न करणारी ही घटना ऐन दिवाळीच्या काळात कानावर आली. तसं तर मुंडे साहेब गेल्यापासून संकटावर संकटे येतात, जातात... आता संकटांची सवय झाली असली तरी दुष्काळ आणि ऊसतोड कामगारांचा संघर्ष याने मात्र मन अधिकच उदास बनले आहे.

मुंडे साहेब केल्यापासून खऱ्या अर्थाने दिवाळी सण उत्सव स्वरूपात आपण कधी केलाच नाही दरवर्षी अनाथ मुलांसोबत आपण दिवाळी साजरी करतो. प्रत्येकाच्या वाट्याला वैभव आणि ऐश्वर्य येतेच असे नाही. मात्र, प्रत्येकालाच सुखाने जगण्याचा अधिकार आहे. माझा जन्म मुंडे साहेबांच्या पोटी झाला, हे माझे भाग्य आहे. पुन्हा जन्माची निवड करण्याची संधी मिळाली तरी मी त्यांच्याच पोटी जन्म घेण्याची इच्छा व्यक्त करेन; पण आजूबाजूला असणाऱ्या कष्टकरी कुटुंबांचे दुःख पाहून मनाला चैन पडत नाही, असे त्या म्हणाल्या.

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत अनेक कुटुंब आर्थिक संकटाचा सामना

पान 3 वर

"मुख्यमंत्र्यांची ही कृती मनाला स्पर्श करणारी...

PM मोदींनी केले देवेंद्र फडणवीसांचं कौतुक



नवी दिल्ली - महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्यातील शेतकऱ्यांच्या घरी जात दिवाळी साजरी करत आहेत. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. मुख्यमंत्र्यांची ही कृती मनाला स्पर्श करणारी आहे अशी भावना नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. दिवाळीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांमध्ये जाऊन दिवाळी साजरी करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. ज्यात त्यांनी नागपूर जिल्ह्यातील लोहारी सावंगा गावातील एका शेतकरी कुटुंबासोबत दिवाळी साजरी केली. शेतकरी अरुणाबाई बालपांडे आणि रामभाऊ बालपांडे यांच्या घरी मुख्यमंत्र्यांनी मुक्काम केला. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देवेंद्र फडणवीस यांचं भरभरून कौतुक केले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र

पान 3 वर

आज ठळक

IMD कडून पुन्हा पावसाचा मोठा इशारा, 13 राज्यांमध्ये धो-धो कोसळणार



भारतीय हवामान विभागाकडून (IMD) महाराष्ट्रासह देशाचा नवा हवामान अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या नव्या हवामान अंदाजानुसार पुढील 24 तासांमध्ये तेरा राज्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. दक्षिण भारतामधील केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यासोबतच उत्तराखंड, पश्चिम बंगाल, सिक्किम, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोरम आणि त्रिपुरा या राजांमध्ये देखील पावसाची शक्यता आहे. तर केंद्रशासित प्रदेशांपैकी लक्षद्वीप, आणि अंदान-निकोबारमध्ये पावसाची शक्यता आहे. दरम्यान या काळात तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश आणि लक्षद्वीप या भागांमध्ये पावसासोबतच वादळाचा देखील इशारा देण्यात आला आहे. विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, याकाळात

पान 3 वर

'शेतकऱ्यांची थट्टा, महाजनांना लाज वाटली पाहिजे', रोहित पवार संतापले!



राज्यातील शेतकरी सध्या भीषण दुष्काळाच्या संकटात आहे. एकीकडे बळीराजा संकटात असल्याने राज्य सरकारने दिवाळीसाठी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 5000 रुपयांची रक्कम जमा केली आहे. आता याच रकमेवरुन भारतीय जनता पक्षाचे नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी मोठं विधान केले आहे. ज्या शेतकऱ्यांना पैशाची गरज नसेल त्या शेतकऱ्यांनी पैसे परत करावेत असं ते म्हणालेत. महाजन यांच्या या विधानावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी संताप व्यक्त केला आहे."गिरीश महाजन साहेबांना मला सांगायचं आहे तुम्हाला लाज वाटायला पाहिजे. एकतर पाच हजार रुपये देऊन तुम्ही शेतकऱ्यांची थट्टा केली आहे. शेतमजूरांना तुम्ही काहीच मदत केली नाही. पवित्रभूमी नाशिकमध्ये जिथे महाकुंभ होतोय, तिथे तुम्ही हजारो कोटींचा भ्रष्टाचार

पान 3 वर

देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्याच्या घरी मुक्काम करत दिवाळी साजरी



दिवाळीच्या सणाला केवळ उत्सवाचे स्वरूप न ठेवता शेतकऱ्यांच्या संकटाच्या काळात आधार देण्याचा संवेदनशील प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा या गावात त्यांनी शेतकऱ्यांच्या घरी मुक्काम करीत गावकऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. शेतकऱ्यांच्या व्यथा, अडचणी आणि अपेक्षा जाणून घेत त्यांच्या प्रश्नांना धीराचा आधार दिला. रामभाऊ बालपांडे यांच्या घरी कुटुंबीयांसमवेत दिवाळी साजरी करत मुख्यमंत्र्यांनी आपलेपणाचा नवा अध्याय लिहिला. यानंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला.मला आज खूप आनंद झाला, रामभाऊ बालपांडे आणि अरुणाताई बालपांडे यांच्या घरी थांबलो होतो. दुष्काळ असूनही या

पान 3

भीक मागो आंदोलनात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा - दीपक देशमुख, बाबा शिंदे

प्रदेश सरचिटणीस राजेभाऊफड करणार आंदोलनाचे नेतृत्व






परळी/प्रतिनिधी

सरकारने शेतकऱ्यांना केलेल्या 5 हजार रुपये मदतीच्या निषेधार्थ आज परळी शहरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून "भीक मागो" आंदोलन करण्यात येणार आहे या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हा असे आवाहन माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख व पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबा शिंदे यांनी केले आहे.

महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाड्यातील शेतकरी दुष्काळाच्या झळा सोसत आहे. पावसाचा खंड पडल्यामुळे खरीप व रब्बी ही दोन्ही पिके हातातून गेली आहेत. शासनाच्या भरीव मदतीची आवश्यकता शेतकरी राजाला असताना 5 हजार रु इतकी तुटपुंजी मदत दिवाळी साजरी करण्यासाठी शेतकऱ्याला दिली आहे. राजा उदार झाला, अन् हाती भोपळा दिला अशी परिस्थिती सरकारची झाली आहे. शेतकऱ्यांना दिलेली 5 हजारांची मदत म्हणजे सबंध शेतकऱ्यांचा अपमान असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शेतकरी विरोधी सरकारचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने "भीक मागो" आंदोलनाचे

पान 3 वर

नागपूरमध्ये सौम्य भूकंप, 2.6 रिश्टर स्केल तीव्रतेची नोंद



नागपूर जिल्ह्यात सौम्य भूकंपाची नोंद झाली आहे. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या अधिकृत नोंदीनुसार, आज दुपारी 2 वाजून 17 मिनिटांनी हा भूकंप झाला आहे. 2.6 रिश्टर स्केल एवढ्या तीव्रतेचा हा भूकंप होता. सुदैवाने या भूकंपामध्ये कोणतीही जीवीतहानी अथवा वित्तहानी झाल्याची नोंद नाही. या भूकंपाची खोली जमिनीखाली 5 किलोमीटर होती. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राने या भूकंपाची नोंद रिव्ह्यूड म्हणजेच तपासून निश्चित केलेली असल्याचं नमूद केलं आहे. या भूकंपाचे धक्के नेमक्या कोणत्या भागात जाणवले आणि

पान 3 वर



● मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मा. डॉ. प्रतापसिंग पाटील हे नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता, त्यांनी शैलेश पाटील कऱ्हाळे यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या देविदास टकले यांच्या कुटुंबाला 25 लाखांची मदत!

आमदार सुरेश धस यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द; दुःखाच्या प्रसंगी टकले कुटुंबाला आर्थिक आधार



कडा : आष्टी तालुक्यातील देवळाली- लोखंडवाडी परिसरात वाघाच्या हल्ल्यात देविदास मारिपाक टकले यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने टकले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या कठीण प्रसंगी कुटुंबाला आधार देण्यासाठी आ. सुरेश धस यांनी पुढाकार घेतला असून,त्यांच्या प्रयत्नातून शासनाच्या वतीने मंजूर करण्यात आलेली आणि वैयक्तिक स्वरुपातील अशी एकूण 25 लाख रुपयांची आर्थिक मदत टकले कुटुंबीयांकडे सुपूर्द करण्यात आली. देविदास टकले यांच्या पत्नी नंदाबाई टकले तसेच त्यांची मुले कृष्णा आणि नितीन यांच्याकडे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते 20 लाख रुपयांचा धनादेश आणि पाच लाख रुपयांची मदत थेट मुदतठेव

पान 3 वर

'आमच्या आयुष्यातील खरा प्रकाश', जय पवारांची अजित दादांसाठी हृदयस्पर्शी पोस्ट!



राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते, जय पवार यांनी बारामतीमध्ये अजित पवार यांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेतले. जय पवार हे सध्या बारामतीच्या दौऱ्यावर असून यावेळी त्यांनी अजित पवार यांच्या स्मृतिस्थळी जाऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. अजित पवार यांच्या निधनानंतरची ही पहिलीच दिवाळी आहे. यावेळी जय पवार यांनी सोशल मीडियावर भावुक पोस्ट करत अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला.राष्ट्रवादीचे नेते जय पवार यांनी दिवंगत नेते अजित पवार यांच्या स्मतिस्थळाचे दर्शन घेतले. यासोबतच त्यांनी

पान 3 वर

दुष्काळात माणुसकीचा आधार! साई प्रेम फाऊंडेशनच्या वतीने 400 निराधार कुटुंबांची दिवाळी गोड

● गुरुदास सेवा आश्रम, वैद्यनाथ मंदिर, रेल्वे स्टेशन व वैद्यनाथ महाविद्यालय परिसरातील निराधारांना दिवाळी फराळ किटचे वाटप; रवींद्र (पापा) गित्ते व सौ.जयश्रीताई गित्ते यांचा पुढाकार





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांचा आणि रोषणाईचा सण नसून नाती जपण्याचा, माणुसकीचा आणि आनंद वाटण्याचा उत्सव आहे. याच भावनेतून सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची जाणीव जपत परळीतील सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या साई प्रेम फाऊंडेशनच्या वतीने 400 निराधार, गोरगरीब व वंचित नागरिकांना दिवाळी फराळ किटचे वाटप करुन त्यांची दिवाळी गोड करण्यात आली. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून 'दुष्काळात माणुसकीचा आधार' देण्यात आला.

साई प्रेम फाऊंडेशनचे साईभक्त तथा उद्योजक रवींद्र (पापा) गित्ते आणि नगर परिषदेच्या पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांच्या पुढाकारातून दीपावली तथा लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हा उपक्रम राबविण्यात आला. घाटनांदूर येथील गुरुदास सेवा आश्रम, परळीतील वैद्यनाथ मंदिर परिसर, रेल्वे स्टेशन परिसर

पान 3 वर

साखर उद्योगाचे दुखणे कायम!



ऊस दर आंदोलनानंतर महाराष्ट्रात 4200 रुपये, कर्नाटकात 3600 रुपये प्रतिटन तोडगा निघाला असला तरी एफआरपी, बोनस आणि कर्जाच्या दुष्टचक्रातून साखर उद्योगाची सुटका कशी होणार?

महाराष्ट्र आणि कर्नाटकातील ऊस उत्पादकांच्या चार दिवसांच्या आंदोलनाची अखेर कोंडी फुटली आहे. महाराष्ट्रात प्रतिटन 3,900 रुपये पहिली उचल, हंगामाच्या अखेरीस 100 रुपये बोनस आणि साखरेचा बाजारभाव प्रतिक्विंटल 4,500 रुपयांच्या पुढे गेल्यास आणखी 200 रुपये, असा एकूण 4,200 रुपयांचा तोडगा निघाला. कर्नाटकात प्रतिटन 3,600 रुपये दरावर शेतकऱ्यांनी आंदोलन मागे घेतले. मात्र हा समझोता म्हणजे साखर उद्योगाच्या मूलभूत समस्येवरील उपाय नव्हे; हंगाम सुरु करण्यासाठी केलेली तात्पुरती मलमपट्टी आहे.महाराष्ट्र आणि कर्नाटकात हंगाम सुरु होण्यापूर्वी एफआरपी अर्थात वाजवी आणि किफायतशीर दरावरुन संघर्ष होणे ही आता वार्षिक परंपरा होते आहे. केंद्र सरकारने निश्चित केलेला एफआरपी शेतकऱ्यांना अपुरा वाटतो. त्यामुळे एफआरपी अधिक बोनस, अशी मागणी पुढे येते. हंगाम लांबला, तर गाळपाचे वेळापत्रक आणि कारखान्यांचे आर्थिक गणित बिघडते. परिणामी कारखानदार बाजारातील परिस्थिती प्रतिकूल असतानाही शेतकऱ्यांना वाढीव दराचे आश्वासन देतात. यंदा ऑगस्ट-सप्टेंबरमधील साखरेच्या दरातील तेजीचा अपवाद वगळता कारखान्यांना अपेक्षित बाजारभाव मिळालेला नाही. निर्यातीच्या मर्यादित संधींमुळेही उत्पन्न वाढवण्यावर बंधने आली. शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी कारखान्यांना वित्तीय संस्थांकडून कर्ज घ्यावे लागते. आधीच्या कर्जाचे व्याज आणि परतफेडीचा भार असतानाच नव्या हंगामात पुन्हा वाढीव दराची जबाबदारी स्वीकारावी लागते. परिणामी कर्जाचा डोंगर वाढतो आणि पुढील हंगामात पुन्हा त्याच संघर्षाची पुनरावृत्ती होते. हे दुष्टचक्र साखर उद्योगाला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करीत आहे.

या समस्येचे मूळ ऊस दरात नसून साखरेच्या विक्री किमतीत आहे. देशातील साखर कारखानदार गेल्या तीन वर्षांपासून साखरेचा किमान हमीभाव प्रतिक्विंटल 5,000 रुपये करण्याची मागणी करीत आहेत. मात्र, केंद्र सरकार महागाई वाढीच्या भीतीने हा निर्णय घेण्यास टाळाटाळ करते आहे. कारखान्यांना साखर विक्रीतून पुरेसे उत्पन्न मिळाले नाही, तर ऊस उत्पादकांना वाढीव दर देण्याची त्यांची क्षमता कशी वाढणार? कर्ज काढून बोनस देणे हा कायमस्वरूपी आर्थिक उपाय होऊ शकत नाही, हे साधे अर्थशास्त्र आहे. ते केंद्र सरकारलाही कळते. पण वळत नाही. यामुळे वार्षिक सुमारे दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या साखर उद्योगाचे भवितव्य टांगणीला लागले आहे. या उद्योगावर लाखो ऊस उत्पादक, कामगार आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अवलंबून आहे. त्यामुळे केंद्र सरकारने साखरेच्या किमान विक्री किमतीचा प्रश्न तातडीने निकाली काढावा. अन्यथा, आजपर्यंत शेतकरी कर्जमाफीसाठी रस्त्यावर येत होते. परंतु, उद्या केंद्र सरकारच्या धोरण दिरंगाईमुळे कर्जाचा डोंगर डोक्यावर असलेले कारखानदार कर्जमाफीसाठी दिल्लीला धडकले, तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.महाराष्ट्रात यंदा ऊस आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर होते. तीन दिवस वाहतुकीचा बोजवारा उडाला. दिवाळीसाठी गावाकडे परतणाऱ्या अनेक कुटुंबांना मनःस्ताप झाला. महामार्गावर वाहनांची दुतर्फा रांग लागली. पण तीन दिवस राज्यातील सरकारने संपर्क साधला नाही. गोकुळ दूध संघाच्या सत्तेसाठी कायदा बदलू पाहणाऱ्या राज्य सरकारला शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी वेळ मिळाला नाही. सणासुदीत एवढा मोठा गोंधळ दुर्लक्षित करता येण्यासारखा नव्हता. आता मुख्यमंत्र्यांनीच पुढाकार घेऊन केंद्राकडून हमीभावाचा प्रश्न सोडवून घेण्यात पुढाकार घ्यावा. चार दिवसांचे आंदोलन संपले, पण संघर्षाचे अर्थकारण संपलेले नाही. दरवर्षी ऊस उत्पादकांना रस्त्यावर उतरावे लागणे आणि कारखानदारांना कर्जाचा आधार घेऊन आश्वासने द्यावी लागणे, ही साखर उद्योगाच्या धोरणात्मक अपयशाची लक्षणे आहेत. एफआरपी वाढविण्याची मागणी आणि कारखान्यांची आर्थिक क्षमता यांच्यात समतोल साधायचा असेल, तर साखरेच्या किमान विक्री किमतीचा निर्णय आता अपरिहार्य आहे. अन्यथा आजचा समझोता उद्याच्या आंदोलनाची केवळ प्रस्तावना ठरेल. केंद्र सरकारने हा प्रश्न आणखी लांबवणे म्हणजे दोन लाख कोटींच्या उद्योगाला अनिश्चिततेच्या खाईत ढकलण्यासारखे आहे.

आपल्या दिवाळीच्या आनंदामागचा एक महामानव!

कामगार, नोकरदार आणि कष्टकरी वर्गाच्या हक्कांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

डॉ. भारत कऱ्हाड



दिवाळीचा सण आला की प्रत्येकाच्या मनात आनंदाचे वातावरण निर्माण होते. वर्षभर कष्ट करणारा माणूस या सणाची आतुरतेने वाट पाहत असतो. नोकरदाराला पगार, बोनस आणि सुट्ट्यांचा आनंद असतो. व्यापाऱ्याला व्यवसायातील उलाढालीचे समाधान असते, तर कष्टकरी माणसाला आपल्या कुटुंबासोबत आनंदाचे काही क्षण घालवण्याची संधी मिळते. घराघरांत दिवे लागतात, लक्ष्मीपूजन होते, फराळाची रेलचेल असते आणि नातेवाईकांच्या भेटीगाठी होतात.

या आनंदाच्या वातावरणात माझ्या मनात एक विचार येतो. आज आपण ज्या अधिकारांसह नोकरी करतो, नियमित वेतन मिळवतो, ठरावीक कामाचे तास पूर्ण करून घरी परततो, रजा घेतो आणि निवृत्तीनंतरच्या आर्थिक सुरक्षिततेची अपेक्षा करतो, त्या अधिकारांच्या इतिहासामागे कोणाचा संघर्ष आहे? कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी कुणी प्रयत्न केले? आपल्या कामाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी कुणी महत्त्वपूर्ण योगदान दिले?

या प्रश्नाचे उत्तर देताना एका महामानवाचे नाव प्रकर्षाने समोर येते. ते म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर!

बाबासाहेबांचे कार्य म्हटले की भारतीय संविधान, सामाजिक समता, अस्पृश्यता निर्मूलन आणि वंचितांच्या अधिकारांसाठीचा संघर्ष आठवतो. मात्र त्यांचे योगदान केवळ सामाजिक न्याय आणि संविधाननिर्मितीपुरते मर्यादित नव्हते. भारतातील कामगार, मजूर, औद्योगिक कर्मचारी आणि महिला कामगार यांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्यही तितकेच महत्त्वाचे आहे.

कामगारांच्या प्रश्नांना प्राधान्य

1942 ते 1946 या काळात बाबासाहेब व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळावर कामगार सदस्य होते. या पदावर असताना त्यांनी कामगारांच्या प्रश्नांचा अभ्यास करून त्यांच्या कल्याणासाठी अनेक महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय आणि सुधारणा घडवून आणण्यासाठी पुढाकार घेतला.

त्या काळात कारखान्यांमध्ये कामगारांना अनेकदा बारा तास काम करावे लागत असे. कामाचे तास, वेतन, सुरक्षितता, आरोग्य आणि विश्रांती याबाबत परिस्थिती समाधानकारक नव्हती. अशा वेळी कामगारांच्या कामाचे तास कमी करून आठ तासांचा कामाचा दिवस निश्चित करण्यासाठी बाबासाहेबांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. 27 नोव्हेंबर 1942 रोजी झालेल्या सातव्या भारतीय कामगार परिषदेत या सुधारणेला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

आज आठ तासांची नोकरी ही आपल्याला सामान्य बाब वाटते. परंतु कामगारांच्या जीवनात या बदलाचे महत्त्व किती मोठे होते, याचा विचार केला पाहिजे. कामगाराला केवळ उत्पादनाचे साधन न मानता त्यालाही कुटुंब, विश्रांती आणि सामाजिक जीवनाचा अधिकार आहे, हा विचार त्यामागे होता.

कामगार कल्याणासाठी व्यापक प्रयत्न

बाबासाहेबांनी कामगारांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक विषयांवर काम केले. कामाच्या ठिकाणी स्वच्छ पाणी, स्वच्छताविषयक सुविधा, सुरक्षितता आणि अग्निसुरक्षा यांसारख्या बाबींवर त्यांनी भर दिला. कारखान्यांमधील कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी कायद्यातील बदलांना चालना दिली.

कामगार संघटनांना मान्यता, औद्योगिक विवादांचे निराकरण, रोजगार विनिमय केंद्रांची उभारणी, कौशल्य विकास, योग्य वेतन आणि महागाई भत्ता यांसारख्या विषयांवर त्यांनी धोरणात्मक काम केले. खाण कामगारांसाठी कल्याणकारी निधी आणि भविष्य निर्वाह निधीच्या व्यवस्थेच्या विकासातही त्यांचे योगदान होते.

या सर्व प्रयत्नांमागे एकच व्यापक विचार होता. कामगाराला केवळ त्याच्या श्रमाचा मोबदला मिळणे पुरेसे नाही, तर त्याला सामाजिक सुरक्षा आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे.

महिला कामगारांच्या हक्कांसाठी योगदान

महिला कामगारांच्या प्रश्नांकडेही बाबासाहेबांनी विशेष लक्ष दिले. विशेषतः खाणींमध्ये काम करणाऱ्या महिलांची परिस्थिती सुधारावी, त्यांना सुरक्षित वातावरण मिळावे आणि प्रसूतीच्या काळात आवश्यक संरक्षण मिळावे, यासाठी त्यांनी भूमिका घेतली. 1943 मध्ये खाणकामगार महिलांच्या प्रसूती लाभासंबंधी विधेयक मांडण्यासह या क्षेत्रातील कायदेशीर संरक्षणाच्या प्रश्नांवर त्यांनी काम केले.

महिलांना समान कामासाठी समान वेतन, सन्मानजनक कामाचे वातावरण आणि मातृत्वाच्या काळात आवश्यक संरक्षण मिळावे, हा त्यांच्या व्यापक सामाजिक न्यायाच्या विचारांचा महत्त्वाचा भाग होता.

संविधानातील कामगार कल्याणाचा विचार

भारतीय संविधानाच्या निर्मितीत मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेबांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. संविधानातील राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे सामाजिक आणि आर्थिक न्यायाची दिशा स्पष्ट करतात.

कलम 39 मध्ये स्त्री आणि पुरुषांना समान उपजीविकेची संधी आणि समान कामासाठी समान वेतनाचा विचार आहे. कलम 41 मध्ये कामाचा अधिकार आणि विशिष्ट परिस्थितीत सार्वजनिक मदतीचे तत्त्व आहे. कलम 42 मध्ये न्याय्य व मानवी कामाच्या परिस्थिती आणि प्रसूती सहाय्याची तरतूद आहे. कलम 43 मध्ये कामगारांना निर्वाह वेतन आणि सन्मानजनक जीवनमान मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

या तरतुदी भारताला कल्याणकारी राज्य बनविण्याच्या व्यापक दृष्टिकोनाचे दर्शन घडवतात.

आजच्या नोकरदारांनी बाबासाहेबांचे स्मरण का करावे?

कामगार म्हटले की केवळ कारखान्यातील मजूर किंवा बांधकाम कामगार डोळ्यांसमोर आणण्याची गरज नाही. शिक्षक, प्राध्यापक, बँक कर्मचारी, सरकारी अधिकारी, लिपिक, परिचारिका, अभियंते आणि खासगी क्षेत्रातील कर्मचारी हे सर्वजण आपल्या श्रमातून देशाच्या विकासात योगदान देतात. व्यापक अर्थाने हे सर्व श्रमिक वर्गाचाच भाग आहेत.

आज आपण नियमित वेतन, कामाचे निश्चित तास, साप्ताहिक सुट्टी, रजा, भविष्य निर्वाह निधी, आरोग्यविषयक संरक्षण आणि निवृत्तीनंतरच्या सुरक्षिततेची अपेक्षा करतो. या सर्व सुविधांचा विकास अनेक कामगार चळवळी, कायदे आणि विविध सरकारांच्या प्रयत्नांतून झाला आहे. त्यातील अनेक महत्त्वपूर्ण सुधारणांच्या पायाभरणीत बाबासाहेबांचे योगदान होते. त्याचे श्रेय इतिहासाच्या योग्य संदर्भात त्यांना दिले पाहिजे.

बाबासाहेब दिवाळीच्या बाजूने होते की विरोधात होते, त्यांनी कोणता सण साजरा केला किंवा कोणत्या धार्मिक परंपरेचे पालन केले, हा या लेखाचा विषय नाही. आपल्यासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे कामगार आणि नोकरदार वर्गाच्या हक्कांसाठी ते ठामपणे उभे राहिले. आपल्या न्याय्य अधिकारांसाठी त्यांनी धोरणात्मक आणि कायदेशीर पातळीवर काम केले. ते आपल्या हक्कांच्या लढ्यातील एक महत्त्वाचे आधार होते.

म्हणूनच दिवाळीच्या आनंदात त्यांच्या योगदानाचे स्मरण करणे ही कृतज्ञतेची भावना आहे. प्रत्येक नोकरदाराने आणि कामगाराने त्यांच्या कार्याचा अभ्यास केला पाहिजे. पुढच्या पिढीपर्यंत हा इतिहास पोहोचवला पाहिजे.

इतर सर्व पूजा-अर्चना करा, आपल्या श्रद्धेनुसार दिवाळी साजरी करा; परंतु आपल्या हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विसरु नका!

आपल्या घरातील दिवाळीचा आनंद आपल्या कष्टातून निर्माण झाला आहे; पण श्रमिकांच्या हक्कांच्या इतिहासात बाबासाहेबांचे योगदानही तितकेच स्मरणीय आहे.

डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,
वराडकर महाविद्यालय
दापोली, जिल्हा रत्नागिरी.

कायदेशीर सेवा : माहिती इतिहास उद्दिष्ट भूमिका आणि महत्त्व

[9-16 नोव्हेंबर:राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन सप्ताह.]

राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन- National Legal Services Day" दरवर्षी दि. 9 नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे सर्व नागरिकांना न्याय मिळवून देणे आणि विशेषत: आर्थिदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांसाठी न्यायप्रविष्ट होण्याच्या मार्गात असलेल्या अडचणी दूर करणे होय. भारताच्या संविधानानुसार प्रत्येक नागरिकाला न्याय मिळणे हे मूलभूत हक्क आहे, परंतु अनेक वेळा आर्थिक अडचणींमुळे गरीब वर्गासाठी न्याय मिळवणे कठीण होते. सदर मार्गदर्शक संकलित लेख दिनविशेषकार- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींची प्रस्तुती जी... संपादक.

राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिनाच्या निमित्ताने, विविध कायदा सेवा प्राधिकरणे व न्यायालये मोफत कायदेविषयक सल्ला, तक्रारींचे निवारण आणि जनजागृती अभियान राबवतात. या दिवसाचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता वाढवणे आणि न्याय व्यवस्थेत त्यांचा विश्वास वाढवणे होय. आपल्या भारतामध्ये दरवर्षी दि.9 नोव्हेंबर हा दिवस "राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन- National Legal Services Day" म्हणून साजरा केला जातो.

मुख्य माहिती आणि इतिहास: स्थापना व सुरुवात: हा दिवस सन 1995 पासून साजरा करण्यास सुरुवात झाली. दि.9 नोव्हेंबर 1995 रोजी "कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा-1987" (Legal Services Authorities Act, 1987) प्रत्यक्ष अमलात आला. उद्देश: समाजातील गरीब, दुर्बल, वंचित, महिला, अनुसूचित जाती-जमाती आणि दिव्यांग घटकांना मोफत, सक्षम व त्वरित कायदेविषयक मदत मिळावी तसेच न्याय प्रक्रियेत सर्वांना समान संधी असावी, यासाठी जनजागृती करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. NALSA ची भूमिका: या कायद्यांतर्गत नॅशनल लीगल सर्व्हिसेस अथॉरिटी, NALSA - राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. NALSA द्वारे देशभरात मोफत कायदेशीर सल्ला, वकील पुरवणे आणि "लोकअदालत"चे आयोजन केले जाते.

 या दिवसाचे महत्त्व: [1] समान न्याय: संविधानातील कलम 39अ नुसार नागरिकांना मोफत कायदेशीर मदत आणि समान न्याय मिळावा या तत्त्वावर हा दिवस आधारित आहे. [2] जनजागृती: सामान्य नागरिकांना त्यांचे कायदेशीर अधिकार, कायदेविषयक योजना आणि विवाद निवारण पद्धतींची (उदा. लोकअदालत) माहिती दिली जाते. [3] अधिकृत माहिती आणि मोफत कायदेशीर मदतीसाठी आपण महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

 इतिहास: दि.9 नोव्हेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय विधी-कायदेशीर सेवा दिन, भारतीय विधी सेवा प्राधिकरण अधिनियम 1987 च्या अंमलबजावणीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. बऱ्याच देशांमध्ये मध्यस्थी आणि कायदेशीर सेवांसारखे विनामूल्य कायदेशीर सेवा उपक्रम सामान्यतः अव्यवस्थित असतात, मागणी अभावी किंवा ग्राहकांच्या गर्दीमुळे ते बंद होतात. लोक अदालत, मध्यस्थी आणि मोफत कायदेशीर मदत यांसारख्या पर्यायी विवाद निराकरण पद्धती तयार करण्यात आल्या आहेत; तथापि प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी कोणतेही विशेष कायदे लागू करण्यात आलेले नाहीत. दि.11 ऑक्टोबर 1987 रोजी कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा 1987 लागू करण्यात आला. हा कायदा दि.9 नोव्हेंबर 1995 रोजी अंमलात आला. भारताचे राष्ट्रीय कायदेशीर सेवा प्राधिकरण-NALSA दि.5 डिसेंबर 1995 रोजी त्याच्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आले. NALSA ने गरजू लोकांना मोफत कायदेशीर मदत आणि सल्ला देणे, मध्यस्थी आणि सलोख्याने समझोता करून प्रकरणांचा निपटारा करणे यासह विविध उपक्रम हाती घेतले. भारतीय न्यायालयांवरील प्रलंबित प्रकरणांचा भार (बॅकलॉग) कमी करण्यासाठी तसेच गरजू पक्षकारांना न्याय मिळवून देण्यासाठी हा एक अनोखा प्रयत्न होता. या प्रसंगाचे स्मरण म्हणून, कायद्याच्या अंमलबजावणीचा दिवस 1995 मध्ये प्रथमच "राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिन" म्हणून साजरा करण्यात आला. प्रत्येक राज्याचे कायदेशीर सेवा प्राधिकरण राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावरील संस्थांमार्फत या दिवसाचे आयोजन करतात.

 उत्सव: कायदेशीर सेवा प्राधिकरण कायद्यांतर्गत असलेल्या विविध तरतुदी आणि पक्षकारांच्या हक्कांविषयी लोकांना जागरुक करण्यासाठी कायदेशीर सेवा दिन साजरा केला जातो. प्रत्येक अधिकारक्षेत्र लोक अदालती, कायदेशीर मदत शिबिरे आणि कायदेशीर मदत कार्यक्रम आयोजित करते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी !

!!! राष्ट्रीय कायदेशीर सेवा दिनाच्या सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!!

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार
आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.
(दिनविशेषकार)
राह. श्रीगुरुदेव
प्रार्थनामंदिर जवळ, एकता चौक,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष-
9699836717.



दिवाळीच्या सुट्टीसाठी गावी आलेल्या 42 वर्षीय न्यायाधीशांचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी अंत;

कवठेमहांकाळ तालुक्यातील घटनेने हळहळ



कवठेमहांकाळ (जि. सांगली) : दिवाळीच्या सुट्टीसाठी गावी आलेल्या वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीशांचा शेतात उतरलेल्या वीजप्रवाहाचा जोरदार धक्का बसून मृत्यू झाला. तुकाराम पतंग मोटे (वय 42, रा.हरोली, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली) असे मृत न्यायाधीशांचे नाव (Sangli judge electrocution accident today) आहे. ते वसई येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश म्हणून कार्यरत होते.

रविवारी (ता. 8) दुपारी देशिंग येथे ही दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे देशिंगसह हरोली परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. देशिंग येथे तुकाराम मोटे आणि आप्पासाहेब कोळेकर यांची शेजारी शेजारी ऊसशेती आहे.रविवारी दुपारी या शेतातील उसाला आग लागल्याची माहिती मिळाली. ही आग पाहण्यासाठी मोटे शेतात गेले होते. त्यावेळी शेतात तुटून पडलेल्या 11 केव्ही उच्चदाब विद्युत वाहिनीच्या संपर्कात ते आले. उच्चदाब विद्युत वाहिनीचा स्पर्श झाल्याने त्यांना विजेचा तीव्र धक्का बसला. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, या आगीत सुमारे दोन हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील ऊस जळून खाक झाला आहे. एकीकडे उसाला लागलेल्या आगीमुळे मोठे नुकसान झाले असताना दुसरीकडे न्यायाधीशांच्या दुर्दैवी मृत्यूने परिसरावर शोककळा पसरली आहे.

आष्टीत वन्यप्राण्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू; 500 मीटर फरफटत नेले, वाघ की बिबट्या?



कडा (जि. बीड): आष्टी वनपरिक्षेत्रातील जंगलालगतच्या ग्रामीण भागात हिंस्र वन्यप्राण्यांच्या वाढत्या हालचाली अखेर मानवी जीवावर बेतल्याची अतिशय दुर्दैवी आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. आष्टी तालुक्यातील देवळाली पानाची येथील टकले वस्तीवरील तरुण शेतकरी देवीदास ऊर्फ पिंटू माणिक टकले (वय 38) यांच्यावर शनिवारी सकाळी डोंगर परिसरात दबा धरून बसलेल्या वन्यप्राण्याने अचानक झडप घालून त्यांना जागीच ठार केले. या हल्ल्यानंतर वन्यप्राण्याने त्यांना 500 मीटर अंतरावरील दाट काटेरी झुडपात ओढून नेल्याने संपूर्ण आष्टी तालुक्यात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र दहशत पसरली आहे. शनिवारी सकाळी नेहमीप्रमाणे देवीदास टकले हे घराजवळच असलेल्या सोनीपठार डोंगर भागात जनावरांसाठी गवत आणण्यासाठी गेले होते. सकाळी 8:30 ते 9:00 वाजेच्या सुमारास ते गवत कापत असताना पाठीमागून आलेल्या हिंस्र प्राण्याने त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. देवीदास यांच्या मानेवर व शरीरावर पकड मिळवून त्या प्राण्याने त्यांना सुमारे अर्धा किलोमीटर (500 मीटर) लांब असलेल्या झुडपांमध्ये ओढत नेले. दरम्यान, वडिलांनी कापलेले गवताचे ओझे डोक्यावरून आणण्यासाठी त्यांचा मुलगा डोंगरावर गेला असता, त्याला वाटेत ठिकठिकाणी रक्ताचे थारोळे आणि ओढत नेल्याच्या खुणा दिसल्या. घाबरलेल्या मुलाने तातडीने वस्तीवर जाऊन गावकऱ्यांना ही माहिती दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

पान 1 वरुन

करत आहेत. ऊसतोड कामगारांचे जगणे तर अधिकच संघर्षमय झाले आहे. त्यांच्या कुटुंबातील मुलांच्या वाट्याला आनंदाचे क्षण यावेत, त्यांच्यासोबत आपुलकीचे नाते अधिक घट्ट व्हावे, या भावनेतून यंदाची भाऊबीज ऊसतोड कामगार व शेतकऱ्यांसोबत साजरी करण्याची इच्छा निर्माण झाल्याचे पंकजाताईंनी सांगितले.

केवळ ऊसतोड कामगारच नव्हे, तर ऊस उत्पादक शेतकरीही आज संकटात आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शेती आणि शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न उभे आहेत. अशा वेळी समाजातील वंचित, कष्टकरी आणि संकटग्रस्त घटकांच्या पाठीशी उभे राहणे ही आपली जबाबदारी आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

फडणवीस यांनी लोहारी सावंगा गावात (नरखेड, नागपूर) शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी केली आणि त्यांनी अरुणाबाई आणि रामभाऊ बालपांडे यांच्या घरी मुक्काम ही केला, ही त्यांची कृती मनाला स्पर्श करणारी आहे. महाराष्ट्रातील एनडीए सरकार शेतकऱ्यांसाठी संवेदनशीलतेने कार्य करत आहे आणि त्यांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील आहे, हे या कृतीतून अधोरेखित होते अशी भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. देशभरात दिवाळीचा उत्साह असताना राज्यातील शेतकरी मात्र चिंतेत आहे. निसर्गाच्या अवकृपेमुळे करपलेली पिके, निर्माण झालेली आर्थिक विवंचना, मुलांच्या शिक्षणाची चिंता त्यांच्या मनात आहे. लोहारी सावंगा येथील शेतकऱ्यांशी या विषयांवर संवाद साधला, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचा ताण हळूहळू निवळताना अनुभवला. "साहेब, तुम्ही थेट आमच्या गावात आलात, आमच्या सुख-दुःखात सहभागी झालात, यातच आमचे अर्धे दुःख हलके झाले," हे त्यांचे शब्द मनाला स्पर्शून गेले. माझ्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याचे पीक म्हणजे केवळ उत्पादन नाही, तर ते त्याच्या संपूर्ण कुटुंबाने वर्षभर केलेल्या कष्टांचे, त्यागाचे आणि स्वप्नांचे प्रतीक आहे. प्रत्येक पिकामागे कुटुंबाच्या भविष्याची आशा असते आणि प्रत्येक हंगामामागे समृद्धीचे स्वप्न असते. निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे जेव्हा पीक उद्ध्वस्त होते तेव्हा शेतकऱ्यांच्या भविष्यावरही संकट येते. आज हे दुःख जवळून अनुभवले. म्हणूनच केवळ मंत्रालयातील बैठका, निर्णय, योजना किंवा आर्थिक सहाय्यापुरते मर्यादित न राहता, बळीराजाच्या शेजारी बसून त्याच्या अडचणी जाणून घेणे, त्याचे अश्रू पुसणे आणि त्याला पुन्हा उभारी देण्यासाठी आधाराचा हात देणे, हा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं.

करत आहात. गरिबांच्या बाबतीत मात्र तुम्ही दिलेले पैसे परत मागत आहात. खरतंर या सरकारमध्ये असलेल्या प्रत्येकाला लाज वाटली पाहिजे, यांना काही कळत नाही. हे नेते आहेत त्यांचा मानच काय? हे समजत नाही. यांना योग्यवेळी जागा दाखवली पाहिजे," अशा शब्दात रोहित पवार यांनी गिरीश महाजन यांच्यावर सडकून टिका केली आहे."पाच पाच हजार रुपयांची मदत सरकारने सर्व शेतकऱ्यांना दिले आहेत. मात्र अनेक शेतकरी असे आहेत माझ्याकडे सकाळपासून 50 शेतकरी आलेत, त्यांनी सांगितलं की आम्हाला पाच हजार रुपये आहेत पण ते मला परत करायचे आहेत. कारण मला आवश्यकता नाही. माझा जोडधंदा आहे, माझ्याकडे तशी पैशाची चणचण नाही. त्यामुळे माझे आवाहन आहे की, ज्यांना गरज नाही अशा आर्थिकदृष्ट्या सक्षम शेतकऱ्यांनी पाच हजार रुपये परत करावेत, असं आवाहन मंत्री गिरीश महाजन यांनी केले होते.

शेतकरी कुटुंबाने आमचं चांगल्या पद्धतीने स्वागत केलं. आम्हाला जेवण दिलं, सकाळी न्याहारीही दिली. एका अर्थाने ते आमचं कुटुंब झाले आणि आम्ही त्यांचं कुटुंब अशी भावनाच आमच्या मनात या क्षणी आहे. नारायणी नावाची त्यांची नात आहे, त्यांचा मुलगा, सून हे सगळेच खूप छान आहेत. एक दिवस या सगळ्यांसह व्यतित केल्यानंतर मलाही समाधान मिळालं. शांत झोप मला त्यांच्या घरी लागली. मी पंतप्रधान नरेंद्र मोदींचेही आभार मानतो. आम्ही हे सगळं करण्याची प्रेरणा पंतप्रधान नरेंद्र मोदींकडूनच घेत असतो. कारण गेल्या अनेक वर्षांपासून दिव्यांग असो, गरीब, वंचित, शेतकरी, शेतमजूर या सगळ्यांना सर्वाधिक प्राथमिकता देतात. त्यामुळेच भारतात 50 कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या बाहेर आले आहेत. आम्ही त्याच संवेदनशीलतने काम करतो आहोत. सध्या राज्यात मोठा दुष्काळ आहे. आम्ही विविध प्रकारची मदत करतो आहोत. तरीही लोकांसमोर समस्या आल्या आहेत. बागायती शेती करायची असेल तर पाणी नाही त्यामुळे झाडं जर पाण्याशिवाय राहिली तर ती मरतील आणि मग नवी झाडं येण्यासाठी 7 ते 12 वर्षांचा कालावधी जाऊ शकतो. एका प्रकारे फळ मिळण्याच्या वेळाला विलंब होईल. ही झाडं कशी जगतील त्यावर आम्ही लक्ष केंद्रीत करतो आहोत. बोअरिंगला आम्ही मान्यता दिली आहे. प्यायचं पाणी, सिंचन यावर आम्ही तोडगा काढण्याचा प्रयत्न करतो आहोत. आम्ही शेतकऱ्यांशी चर्चा केली तसंच आता सरपंचांशीही चर्चा केली. समस्या लक्षात घेऊन त्या प्रमाणे निर्णय घेतला जाईल असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.काल रात्री लोहारी सावंगा गावातील बालपांडे या शेतकरी कुटुंबाच्या घरी मुक्काम केल्यानंतर आजची दिवाळी पहाट कुटुंबीयांनी केलेल्या औक्षणाने अधिकच प्रसन्न झाली. यावेळी गावातील शेतकरी बांधवांशी मनमोकळा संवाद साधला. गावाकडच्या शांत वातावरणात, निसर्गाच्या सान्निध्यात निवांत वेळ घालवता आला. माणसांची आपुलकी, त्यांचा जिव्हाळा आणि गावातील प्रसन्न वातावरण यामुळे मनाला विशेष आनंद आणि समाधान मिळाले.

आयोजन करण्यात आले आहे. या पदयात्रेची सुरुवात आज सकाळी 10 वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून होणार आहे. पुढे ही पदयात्रा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक रेल्वे स्टेशन परळी येथून मोंढा मैदानाकडे मार्गस्थ होणार आहे. या आंदोलनाचा समारोप राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. या पदयात्रेच्या माध्यमातून भीक स्वरुपात पैसे 5 हजार रु जमा करुन दिवाळी साजरी करण्यासाठी प्रशासनामार्फत सरकारकडे पाठवण्यात येणार आहे.

तरी सरकार विरोधातील जनतेचा रोष व्यक्त करण्यासाठी शेतकरी, महिला भगिनी व नागरिकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक नाना देशमुख, पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, युवक तालुकाध्यक्ष मुन्ना काळे, अंबेजोगाई युवक तालुकाध्यक्ष राजकमल देशमुख, परळी शहराचे युवक शहराध्यक्ष सय्यद फिरोज, अनुसूचित जाती आघाडीचे विधानसभा अध्यक्ष रमेश गायकवाड यांनी केले आहे.

(एफडी) स्वरुपात सुपूर्द करण्यात आली.यावेळी कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत आमदार धस यांनी त्यांचे सांत्वन केले.

वाघाच्या हल्ल्यात कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचा अचानक मृत्यू होणे ही अत्यंत वेदनादायी घटना आहे.आर्थिक मदतीमुळे कुटुंबीयांचे झालेले नुकसान भरुन निघणार नसले, तरी या कठीण प्रसंगी त्यांना आर्थिक आधार मिळावा आणि पुढील आयुष्य जगताना काही प्रमाणात दिलासा मिळावा,या भावनेतून ही मदत देण्यात आल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

दरम्यान, देवळाली- लोखंडवाडी परिसरातील या घटनेमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. केवळ आर्थिक मदत देऊन हा प्रश्न संपणार नाही,तर भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी वनविभागाने प्रभावी पावले उचलणे गरजेचे आहे. परिसरातील नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात,अशा स्पष्ट सूचना आ.सुरेश धस यांनी संबंधित वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी वनविभागाचे विभागीय वन अधिकारी अमोल गरगळ,आष्टी वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ शिरसाठ, उपसभापती केशर तांबडे, रुपमान तळेकर, सरपंच प्रभाकर मुळीक, सरपंच मोहन आमटे, माजी सरपंच बबन तळेकर, सरपंच पोपट शेळके, सुदर्शन मुळे, रमेश डोळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

इन्स्टाग्रामवर फोटो पोस्ट करत दादांच्या आठवणींना उजाळा दिला. "दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण, पण आमच्या आयुष्यातील खरा प्रकाश तुम्ही होता, Dad. तुमच्या सहवासाने घर उजळलं, तुमच्या प्रेमाने कुटुंब एकत्र राहिलं आणि तुमच्या विचारांनी आयुष्याला दिशा मिळाली. आज तुमच्या स्मृतिस्थळी येऊन आशीर्वाद घेतले. तुम्ही दिलेला प्रकाश कधीही मावळणार नाही," अशा भावुक शब्दात जय पवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.राज्यभरात दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. राजकीय वर्तुळातही दिवाळीची धामधुम सुरु आहे. मात्र बारामतीमध्ये पवार कुटुंबियांनी यंदा दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे. 28 जानेवारी रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झाले. अजित पवार यांच्या निधनानंतर पवार कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला. अजित दादांच्या निधनानंतरची ही पहिलीच दिवाळी आहे, सोबतच राज्यात दुष्काळाचे सावट आहे. यामुळेच यंदा दिवाळी साजरी करणार नसल्याचे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी स्पष्ट केले होते.दरम्यान, सध्या राजकीय वर्तुळात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. शरद पवार हे रुग्णालयात दाखल झाल्यानंतर त्यांना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बडे नेते भेटून गेले, त्यासोबतच त्यांच्या सिल्वर ओक या निवासस्थानी खासदार पार्थ पवार यांनी दोनदा शरद पवार यांची भेट घेतली. ज्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चा जोर धरु लागल्या आहेत.

तसेच वैद्यनाथ महाविद्यालय परिसरातील निराधार व गरजू नागरिकांपर्यंत फाऊंडेशनच्या वतीने त्यांना दिवाळी फराळ किटचे वाटप करून त्यांच्यासोबत आपुलकीने संवाद साधत दिवाळी साजरी करण्यात आली.

दिवाळीचा आनंद प्रत्येकाच्या आयुष्यात पोहोचावा, अन्नापासून कुणीही वंचित राहू नये, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. 'अन्नाविन वंचित कुणी न राहो, एवढा आशीर्वाद आम्हा तुम्ही द्याहो' या भावनेतून फाऊंडेशनने निराधारांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा प्रयत्न केला. साई प्रेम फाऊंडेशनच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जात असून, सामाजिक संवेदनशीलता आणि सेवाभाव जपण्याचे काम केले जात आहे.

दुष्काळासारख्या कठीण परिस्थितीत समाजातील गरजू घटकांच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे. 'दुष्काळासारख्या आपत्तीत आम्ही सारे आपल्या सोबत आहोत,' हा विश्वास या उपक्रमातून निराधार व वंचित नागरिकांना देण्यात आला. दिवाळीच्या फराळासोबत मिळालेली आपुलकी, संवाद आणि मायेच्या सहवासामुळे लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले. यावेळी भास्कर मामा चाटे, सुरेश टाक, टी.डी. मुंडे, मुंबई येथील अभियंता अमोल सोनवणे, भागवत मुंडे, जगु पवार, महेश मंत्री, राज (प्रेम) रवींद्र गित्ते, रुजूता (सई) रवींद्र गित्ते, पिंटू दुदले, प्रसाद कुलकर्णी आदी उपस्थित होते.

वाऱ्याचा वेग प्रति तास 40 ते 50 किमी इतका राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान यंदा पावसावर ऐल निनोचं मोठं संकट होतं, ऐल निनोमुळे पावसात मोठा खंड पडला. पाऊसच न पडल्यामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. राज्यात दुष्काळ पडला आहे. अन्नधान्याची तर टंचाई आहेच, सोबतच जनावरांच्या चाऱ्याचा तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील बिकट बनला आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर वाढलं आहे.

नागरिकांना त्याची जाणीव झाली का? हे कळू शकलेलं नाही. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या अधिकृत नोंदीनुसार आज दुपारी दोन वाजेच्या आसपास या भूकंपाची नोंद झाली आहे. हा सौम्य भूकंप होता. या भूकंपाची खोली जमिनीखाली 5 किलोमीटर होती. या भूकंपाचे धक्के नेमक्या कोणत्या भागात जाणवले आणि नागरिकांना त्याची जाणीव झाली का? यांची माहिती मात्र अद्याप समोर आलेली नाहीये. दरम्यान काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये देखील भूकंप झाला होता. ऑगस्ट महिन्यात नाशिकला देखील भूकंपाचे धक्के बसले होते. 3.4 रिस्टल स्केल एवढी या भूकंपाची नोंद झाली होती. या भूकंपामुळे नागरिकांमध्ये घबराटीचं वातावरण निर्माण झालं होतं. नाशिक आणि गुजरातच्या परिसरात भूगर्भात सुरु असलेल्या हालचालींमुळे नाशिकला मधून मधून भूकंपाचे धक्के जाणवत असल्याचं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे. नाशिक जिल्ह्यात या वर्षी दोन ते तीन वेळा सौम्य भूकंपांचे धक्के जाणावले आहेत.

पान 4 वरुन

शेतकऱ्यांना प्रत्येकी 5 हजार रुपये दिवाळी अग्रीम देण्यांच्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी झाली असून, 5 नोव्हेंबर 2026 अखेर राज्यातील 87 लाख 45 हजार हून अधिक शेतकऱ्यांच्या खात्यात 4 हजार 372 कोटी रुपयांहून अधिकची मदत जमा झाली आहे.

तिघे जण गंभीर भाजले. जखमींना गेवराईतील खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले आहे.

महागाईमुळे हा व्यवसाय संकटात सापडला असून अनेकांनी या व्यवसायाकडे पाठ फिरवली आहे.सध्या डिझेलचे दर वाढले आहेत, क्लीनर व चालकांचा पगार वाढला आहे, तसेच शासनाचे मल्टी टॅक्स यामध्ये नॅशनल परमिट, विमा, टोलनाक्याचा टॅक्स, नवीन कंटेनर खरेदी करताना जीएसटी आणि भाड्यातून मिळालेल्या रकमेवरही जीएसटी द्यावा लागतो. अशा अनेक प्रकारच्या मल्टी टॅक्सच्या ओझ्यामुळे कंटेनर मालक हातघाईला आले आहेत. विशेष म्हणजे, कंटेनरला मिळणाऱ्या भाड्यामध्ये मात्र 2015 नंतर कसलीही वाढ झालेली नाही. त्यामुळे कंटेनर मालकांवर मोठी संक्रात आल्याची माहिती सांगवी येथील कंटेनर मालक बाबासाहेब धस यांनी दिली.सहा टायर असलेल्या कंटेनरच्या एका टायरची किंमत 30 हजारांवरून 40 हजार रुपयांवर पोहोचली आहे. तसेच कंटेनरची किंमत 14 लाखांवरून 24 लाख रुपये झाली असून नॅशनल परमिटचे दर दरवर्षी 16 हजार 500 रुपयांवरून वाढवून 20 हजार 500 रुपये भरावे लागत आहेत. शासनाच्या उदासीन धोरणामुळे आणि वाढत्या महागाईमुळे हा व्यवसाय अडचणीत आला आहे. या परिस्थितीमुळे सांगवी येथील सुशिक्षित बेरोजगार कंटेनर चालक, 450 क्लीनर आणि मालक मिळून तब्बल 1200 कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. यामुळे त्रस्त होऊन सांगवी येथील 15 कंटेनरचे मालक असलेले हनुमंत लक्ष्मण केदार यांच्यासह एकूण 50 कंटेनर मालकांनी आपले कंटेनर विकून शेती, व्यापार व इतर व्यवसायांना पसंती दिली असल्याची माहिती समोर आली आहे.

प्रतिभा पवार यांची भेट घेतली. त्यानंतर आजोबा आणि नातवामध्ये कोणतीही चर्चा झाली नाही. पार्थ पवार शरद पवार यांची भेट न घेताच निघून गेल्याचे समजते. पार्थ पवार सिल्व्हर ओकवर आले त्यावेळी शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बैठक सुरू होती. या बैठकीमध्ये प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, डॉ. अमोल कोल्हे, अनिल देशमुख हे उपस्थित होते. या बैठकीमुळेच पार्थ पवार हे फक्त प्रतिभा पवार यांनाच भेटून सिल्व्हर ओकमधून निघून गेले. त्यामुळेच पार्थ पवार आणि शरद पवार यांची भेट होऊ शकली नाही, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

दल, जेसीबी ऑपरेटर, विद्युत विभाग तसेच नागरी उपजीविका अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कामगारांचे वेतन दिनांक 07 नोव्हेंबर 2026 पर्यंत अदा करण्यात येतील असे आश्वासन दिले होते ते पूर्ण केल्यामुळे संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोरील धरनेआंदोलन व परळी वैजनाथ येथील नगरपरिषद अध्यक्षा यांच्या घरासमोरील काळी दिवाळी साजरी करण्याचे धोरण तुर्तास

स्थगित करण्यात आले. अशी माहिती पोलिस अधीक्षक कार्यालय बीड यांचे प्रतिनिधी डीएसबी विभागाचे प्रमुख महेश गिते यांना देण्यात आली.

सर्वच कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संघटनेबद्दल समाधानाचे वातावरण तयार झाले आहे. दिवाळीच्या सणापूर्वीच वेतन मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांना सणाचा आनंद साजरा करण्यासाठी आर्थिक मदत झाली आहे. नगर परिषदेच्या या निर्णयाचे संघटनेच्या वतीने हार्दिक अभिनंदन करुन स्वागत करण्यात येत आहे. याबद्दल जिल्ह्यातील सर्व नगराध्यक्ष/ नगराध्यक्षा, उपाध्यक्ष, स्वच्छता सभापती तसेच संबंधित विभागाचे सभापती, मुख्याधिकारी, उपमुख्याधिकारी, सर्व नगरसेवक, नगरसेविका यांचे आभार व्यक्त केले आहे. अशी माहिती रोजंदारी मजदूर सेनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

केली जाते. पूर्वी या कामासाठी पारंपरिक केरसुणी आणि फड्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी केरसुणीचे पूजन करण्याची परंपराही आज अनेक घरांमध्ये कायम आहे. मात्र, वर्षभर या वस्तूंना मर्यादित मागणी असते. दिवाळीच्या काळातच काही प्रमाणात विक्री वाढत असल्याने या व्यवसायातील विक्रेत्यांचे आर्थिक गणित प्रामुख्याने सणाच्या हंगामावर अवलंबून असते. यंदा मात्र पारंपरिक केरसुणी व्यवसायाला महागाईची मोठी झळ बसली आहे. केरसुणी तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यातच कुशल कामगार मिळणेही कठीण झाले आहे. दुसरीकडे आकर्षक रंगांचे प्लास्टिकचे झाडू आणि मशीननिर्मित स्वच्छता साधनांचा बाजारातील वापर वाढत आहे. सहज उपलब्धता आणि बदलत्या राहणीमानामुळे ग्राहकांचा कलही आधुनिक पर्यायांकडे वळला आहे.

विशेषतः शहरांमधील फ्लॅट संस्कृतीमुळे पारंपरिक केरसुणीची मागणी घटल्याचे विक्रेते सांगतात. पूर्वी अनेक घरांमध्ये वर्षातून अनेकदा पारंपरिक फडे खरेदी केले जात होते. आता मात्र दिवाळीपुरतीच खरेदी केली जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वर्षभर व्यवसाय सुरु ठेवणे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे विक्रेत्यांसाठी कठीण बनले आहे.

यंदा गतवर्षीच्या तुलनेत फड्यांच्या दरात सुमारे 10 ते 15 टक्क्यांनी वाढ झाली आहे. आकारानुसार मोठा फडा 50 ते 60 रुपये, तर लहान फडा 30 ते 40 रुपये दराने विकला जात आहे. कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमती, मजुरांची अनुपलब्धता आणि उत्पादन खर्चातील वाढ यामुळे दर वाढविण्याशिवाय पर्याय नसल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

वास्तविक, केरसुणी हे केवळ स्वच्छतेचे साधन नसून आपल्या परंपरेचा आणि संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. स्वच्छता असलेल्या ठिकाणी लक्ष्मीचा वास असतो, अशी श्रद्धा आजही कायम आहे. त्यामुळे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी केरसुणीला विशेष महत्त्व दिले जाते. मात्र, ज्या वस्तूला लक्ष्मीचे प्रतीक मानून पूजले जाते, ती तयार करणाऱ्या कष्टकरी कारागिरांच्या घरातच आर्थिक स्थैर्याचा अभाव असणे, ही बदलत्या काळातील विसंगती आहे.

वाढवली आहे. आता तिसऱ्या टप्प्यात बीड जिल्ह्यात शाखा विस्ताराची मोहीम अधिक जोमाने राबविण्याचा निर्धार मा.हनुमंत तोंडे यांनी व्यक्त केला.यावेळी प्रहारचे किल्ले धारूर उपाध्यक्ष विष्णू चोले, शाखाप्रमुख प्रदीप चोले, दत्तू चोले, इस्माईल पठाण यांच्यासह आस्वला येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

टाकून शनिवारी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या दरम्यान ते मोटारसायकलवरुन घरी परतत होते. याचवेळी मोटारसायकल आणि कार यांच्यात भीषण अपघात झाला. धडक एवढी जोरात होती की कारने मोटरसायकलला तब्बल 300 फूट पर्यंत फरफटत नेले. या अपघातात तिघांना गंभीर दुखापत झाली. उपचार मिळण्यापूर्वीच या दुर्दैवी घटनेत तिघांचाही मृत्यू झाला.

दिवाळीचा सण अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला असताना पडोळे कुटुंबावर काळाने घाला घातला. सणासाठी घरी परतणाऱ्या कुटुंबीयांवर नियतीने असा आघात केल्याने गावकऱ्यांचेही मन सुन्न झाले आहे. घरात दिवाळीची तयारी आणि सणाचा उत्साह असण्याऐवजी आता दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

अपघातानंतर मृतदेहांचे शवविच्छेदन मिरजगाव येथे करण्यात आले. या भीषण अपघातप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी पुढील तपास करीत आहेत. दिवाळीच्या मंगलमय पर्वावर एका कुटुंबातील तिघांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने केळसांगवी गावावर शोककळा पसरली आहे. आनंदाचा सण एका क्षणात दुःखात बदलल्याने संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

नुकत्याच बापाचे छत्र हरवून बसलेल्या श्रेयाने "आजोबा, मला दिवाळीला नवे कपडे घ्या ना... नवे कपडे आणि फटाके मला पाहिजेत," असा हट्ट धरला होता. आजोबा शेतातील कापूस विकून येणाऱ्या पैशातून तिला नवे कपडे घेणार होते. मात्र नियतीला हे मान्य नव्हते. एका क्षणात या चिमुरडीचा जीव गेल्याने संपूर्ण पंचक्रोशीतुन हळहळ व्यक्त होत आहे.

येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांच अंतिम वेळापत्रके जाहीर करण्यात आली आहेत. बोर्डाच्या दहावी आणि बारावीच्या लेखी आणि प्रॅक्टिकल परीक्षांच्या तारखा देखील निश्चित करण्यात आल्या आहेत. बारावीच्या परीक्षा ही 8 फेब्रुवारीपासून सुरु होईल. तर दहावीची लेखी परीक्षा ही 15 फेब्रुवारीपासून सुरु होईल. या परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळाकडून अधिकृत परिपत्रक जीर करण्यात आलं. परीक्षा देणारे विद्यार्थी हे मंडळाच्या अधिकृत संकेतस्थावर जाऊन संपूर्ण वेळापत्रक पाहू शकता.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आलं. बोर्डाने पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण या नऊ विभागात फेब्रुवारी-मार्च 2027 मध्ये लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती बोर्डाने दिली. बारावी बोर्डाची प्रॅक्टिकल तोंडी परीक्षा ही 20 जानेवारी 2027 ते 6 फेब्रुवारी 2027 दरम्यान होणार आहे. तर दहावी बोर्डाची प्रॅक्टिकल तोंडी परीक्षा ही 28 जानेवारी 2027 ते 13 फेब्रुवारी 2027 दरम्यान होणार आहे. त्यामुळे आता विद्यार्थ्यांना परीक्षांची तयारी करावी लागणार आहे.

दसरा सणाच्या वेळी झेंडू उत्पादक शेतकऱ्यांना अपेक्षित भाव मिळाला नव्हता. मात्र, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर झेंडूच्या फुलांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढली. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला.

परभणी शहरातील अनेक ग्राहकांनी झेंडूच्या फुलांची चढ्या दराने खरेदी करुन शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला. दसऱ्याला झालेल्या नुकसानीची काही प्रमाणात भरपाई दिवाळीच्या बाजारपेठेतून होईल, अशी आशा उत्पादक शेतकऱ्यांना वाटू लागली आहे.दिवाळीत झेंडूला मिळाला चांगला भाव - शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसदसऱ्यात नुकसान, दिवाळीत दिलासा - मागणी वाढल्याने दरात सुधारणाशेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरली यंदाची दिवाळी

त्यांनी सांगितले.

यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना बाबासाहेब साळवे यांनी, "मला मेल्यानंतरही जिवंत राहायचे आहे," असे प्रेरणादायी उद्गार काढले. माणसाचे आयुष्य किती मोठे आहे, यापेक्षा त्याने समाजासाठी केलेले कार्य किती मोठे आहे, याला अधिक महत्त्व असते. आपण केलेल्या सामाजिक, धार्मिक आणि विधायक कार्यातून पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळावी, समाजाच्या स्मरणात आपले कार्य राहावे, हीच भावना असल्याचे त्यांच्या वक्तव्यातून अधोरेखित झाले.

भंतेजी विवेकानंद यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना, भगवान बुद्धांनी दिलेला मानवतेचा संदेश घराघरांत आणि मनामनांत पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. धम्माचे काम अविरतपणे सुरु ठेवा, समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत बुद्धांचे विचार पोहोचवा, तरुण पिढीला धम्माची शिकवण द्या आणि सामाजिक एकोपा टिकवून ठेवा, असे आवाहन त्यांनी केले.

क्रांतीसूर्य सेवाभावी संस्थेने बीड जिल्ह्यामध्ये तब्बल 200 भगवान गौतम बुद्धांच्या मूर्ती भेट देण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प केला आहे. या संकल्पातून जिल्ह्यातील विविध बुद्ध विहारांना बुद्धमूर्ती उपलब्ध करुन देत धम्माचा विचार अधिक व्यापक करण्याचा संस्थेचा मानस आहे. केवळ मूर्ती भेट देणे नव्हे, तर भगवान बुद्धांच्या विचारांची सामाजिक रुजवणूक करणे, हा या उपक्रमामागील व्यापक उद्देश असल्याचे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले.

या बुद्धमूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी माझगाव मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने बौद्ध बांधव, धम्मप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. उपस्थितांच्या सहभागामुळे संपूर्ण नागवंशी बौद्ध विहार परिसरात उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

क्रांतीसूर्य सेवाभावी संस्थेच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले. बीड जिल्ह्यात 200 बुद्धमूर्ती भेट देण्याचा संकल्प प्रत्यक्षात उतरल्यास जिल्ह्यातील धम्म चळवळीला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

भगवान बुद्धांच्या करुणा, प्रज्ञा आणि समतेचा संदेश समाजात रुजविण्याच्या दिशेने क्रांतीसूर्य सेवाभावी संस्थेने उचललेले हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी ठरत असून, नागवंशी बुद्ध विहारातील बुद्धमूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उपस्थितांच्या स्मरणात राहणारा ठरला.

ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरला.

या कार्यक्रमास संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा.प्रसाद देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे,कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.राजकुमार यल्लावाड,समन्वयक प्रा.डॉ.राजश्री कल्याणकर,डॉ. विवेकानंद कवडे,डॉ.पंढरी गुट्टे,प्रा. सिद्धेवर कोकाट,श्री.राजेश देशमुख,पांडुरंग किटाळे यांच्यासह मिरवट येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात मिरवट गावच्या सरपंच सौ.प्रतीक्षा गणेश भंडारे,ग्रामस्थ

श्री.वैजनाथ भदाडे,श्री. माऊली इंगळे, श्री.राजाभाऊ पवार,श्री.गणेश भदाडे,श्री.पांडुरंग बोडके,श्री.आकाश इंगळे,श्री.माऊली पांचाळ,श्री. भिमराव पवार आदींची उपस्थिती होती.

कीर्तनाच्या माध्यमातून जलसंवर्धन आणि राष्ट्रीय एकात्मतेचा विचार जनमानसात रुजविणारा हा उपक्रम सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

स्त्रीः सम्राज्ञी ते दासी.

स्त्रीः समतावादी मातृसत्ताक समाजपध्दतीत घर, कुटुंब, कबिला, समाज, राज्य व राष्ट्राची एकेकाळची सम्राज्ञी असलेली ; विषमतावादी पुरुषसत्ताक समाज पध्दतीत दासी बनवली गेली. तिच्याकडून पौरिहित्यासह घरचा सर्व कारभार काढला गेला. तिला अबला व नादान ठरवले गेले.

तिच माहेर सोडणं स्वाभाविक मानलं गेलं,
तिचं नाव बदलणं परंपरा मानली गेली,
तिची सेवा कर्तव्य मानली गेली,
तिच्या इच्छांचा बळी दिला गेला,
तिला चार भिंतींच्या आत बंदिस्त केलं गेलं,
प्रजोत्पादन व पतीची सेवा हिच तिची नियती मानली गेली.

परंतु, आपला इतिहास, सण- उत्सव तपासा! ते काय म्हणतात ते पहा!

आपल्या सर्व सण- उत्सवांचे पौरिहित्य अजूनही स्त्री करते
आपल्या सर्व मातृदेवता, कुलमाता स्त्रियाच आहेत.
आपल्या सर्व जीवनदायणी नद्यांची नावे स्त्रीवाचक आहेत.
मग, ती अबला, अपवित्र व दुय्यम कशी?
मानसिकता बदला! स्त्रीयांचे जीवन बदलेलं!

स. वा. राजाराम तुळसाबाई सुकदेव सूर्यवंशी.





बीड जिल्ह्यातील एकमेव विश्वासार्ह बातम्यांचे दैनिक परळी संघर्षनेता

हॅलो बीड

परळी संघर्षनेता

सोमवार दि. 09 नोव्हेंबर 2026

4

ऊसतोड मजुरांसोबत पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांची दिवाळी

परभणीचे कष्टकरी एकटे नाहीत पालकमंत्री आपल्या पाठीशी आहे



परभणी / प्रतिनिधी : अनंत कोरे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत, परभणीच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी यंदाची दिवाळी जिंतूर तालुक्यातील ऊस तोड मजुरांच्या पालावर जाऊन अत्यंत साधेपणाने आणि संवेदनशीलतेने साजरी केली, तर दुसरीकडे शासनाच्या माध्यमातून परभणी जिल्ह्यातील 3 लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात 168 कोटींहून अधिकची दिवाळी अग्रीम मदत जमा करत परभणी जिल्ह्यातील शेतकरीवर्गाची दिवाळी आनंदाची केली.

दिवाळी हा आनंदाचा सण असला तरी सध्याच्या शेतीपुढील आव्हानांमुळे आणि ऊस तोडीसाठी गावोगाव भटकंती करणाऱ्या मजुरांना अनेकदा सणापासून दूर राहावे लागते. ही सामाजिक जाणीव ठेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील मंत्र्यांनी शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले होते.याच पार्श्वभूमीवर पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज जिंतूर तालुक्यातील आडगाव दराडे परिसरातील ऊस तोड मजुरांच्या पालाला अचानक भेट दिली. या भेटीत त्यांनी मजुरांच्या चिमुकल्या मुलांना स्वतःच्या हाताने नवे कपडे घातले, फराळाचं वाटप केले आणि त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील 304 दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र

पान 3 वर

फटाक्यांच्या आगीत गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट; तिघे गंभीर भाजले!

गेवराईतील संजयनगरमधील घटना; घराचे मोठे नुकसान, दुचाकीही जळाली



गेवराई : गेवराई शहरातील संजयनगर भागात दिवाळीसाठी आणलेल्या फटाक्यांना लागलेल्या आगीने रौद्ररुप धारण केले. घरात जवळच असलेल्या गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाल्याने तिघे जण गंभीर भाजले. शनिवारी (दि. 7) रात्री सात वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या स्फोटामुळे घरातील साहित्य जळून खाक झाले असून घराचेही मोठे नुकसान झाले आहे. याशिवाय एक दुचाकीही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. सुवर्ण लक्ष्मण चव्हाण, जनाबाई राठोड आणि अमोल राठोड (रा. संजयनगर, गेवराई) अशी जखमींची नावे आहेत. संजयनगर भागात त्यांचे पत्र्याचे घर असून दिवाळीनिमित्त आणून ठेवलेल्या फटाक्यांना शनिवारी रात्री अचानक आग लागली. आगीची तीव्रता वाढत गेल्याने घरातील जवळच असलेल्या गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. या भीषण स्फोटात घरात असलेले

पान 3 वर

मजुरांनी मेहनतीने ४५० कंटेनर घेतले; पण 'मल्टी टॅक्स'ने मोडले कंबरडे,सांगवी ग्रामस्थ पुन्हा संकटात!



केज : केज तालुक्यातील सांगवी (सारणी) हे गाव पूर्वी ऊसतोड मजुरांचे गाव म्हणून ओळखले जात होते. परंतु, या गावातील तरुणांनी कंटेनर व्यवसायातून राज्यामध्ये एक वेगळी छाप निर्माण करत गावात 450 कंटेनर खरेदी करून या व्यवसायात क्रांती केली होती. मात्र, शासनाच्या उदासीनतेमुळे आणि वाढत्या महागाईमुळे सध्या या कंटेनर व्यवसायावर मोठी संक्रात आली असून, मालक, चालक व क्लीनर मिळून तब्बल 1,200 कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे.केज तालुक्यातील सांगवी (सारणी) हे गाव ऊसतोड मजुरांचे गाव म्हणून ओळखले जात होते. ऊसतोडीच्या व्यवसायातून व मुकादमांच्या माध्यमातून गावातील तरुणांमध्ये संपन्नता आली. यामुळे जागृती निर्माण होऊन गावात 450 हून अधिक कंटेनर खरेदी करण्यात आले. याद्वारे ऊसतोड मजुरांचे गाव हा कलंक पुसून सांगवी (सारणी) या गावाने राज्यातील सर्वाधिक कंटेनर असलेले गाव म्हणून नवी ओळख निर्माण केली होती. परंतु, अलीकडच्या काळात वाढत्या

पान 3 वर

शरद पवारांच्या भेटीसाठी पार्थ पवार पुन्हा एकदा 'सिल्व्हर ओक'वर



मुंबई, : राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव प्रत्यक्षात येईल का याबद्दल जोरदार चर्चा सुरु असतानाच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार आज पुन्हा एकदा सिल्व्हर ओकवर शरद पवारांच्या भेटीसाठी गेले आहेत. शनिवारी त्यांची शरद पवारांशी भेट होऊ शकली नाही. आज पुन्हा एकदा ते शरद पवारांना भेटायला सिल्व्हर ओकवर दाखल झाले आहेत.राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव प्रत्यक्षात येईल का याबद्दल जोरदार चर्चा सुरु असतानाच या कल्पनेला विरोध करणारे पार्थ पवार शनिवारी 'सिल्व्हर ओक'वर गेले होते. मात्र यावेळी पार्थ पवार यांनी शरद पवार यांची भेट घेतलीच नसल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.सिल्व्हर ओकवर गेल्यानंतर पार्थ पवारांनी

पान 3 वर

पाणीबचत आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश कीर्तनातून

कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा उपक्रम



परळी ,दि.06/11 / 2026 (प्रतिनिधि) येथील कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन जनजागृती करण्याच्या उद्देशाने मिरवट येथे ह.भ.प.डॉ.श्याम नेरकर महाराज यांच्या प्रबोधनपर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. पाणी हे केवळ नैसर्गिक साधन नसून मानवी जीवनाचा आधार आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे संवर्धन आणि काटकसरीने वापर ही काळाची गरज बनली आहे.असा मोलाचा संदेश ह.भ.प डॉ. श्याम नेरकर महाराज यांनी कीर्तनाच्या माध्यमातून दिला.त्याचबरोबर सामाजिक सलोखा,बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना समाजात रुजविणे आवश्यक आहे. तरच राष्ट्राचा विकास गतीने होईल. असे मत मांडत असताना ही मूल्य जोपासणे म्हणजेच राष्ट्रपती होय असा विचारही त्यांनी यावेळी मांडला.

'पाणीबचत काळाची गरज आणि राष्ट्रीय एकात्मता' या विषयाला केंद्रस्थानी ठेवून महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून उपस्थित ग्रामस्थांना केलेले मार्गदर्शन दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निश्चितच फलदायी आहे. संतवाङ्मय,अभंग,दृष्टान्त आणि दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा आधार घेत त्यांनी पाण्याचे महत्त्व,पाणी बचतीची आवश्यकता,जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धन याविषयी प्रभावीपणे विचार मांडले.पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल असून पाण्याचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे असा संदेश त्यांनी दिला.

राष्ट्रीय एकात्मतेविषयी बोलताना जात,धर्म,भाषा आणि प्रांत यापलीकडे जाऊन माणुसकीच्या नात्याने एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले. संतांच्या विचारांतून समता,बंधुता आणि सर्वधर्मसमभावाची शिकवण मिळते.कीर्तनासारख्या लोकाभिमुख माध्यमातून सामाजिक प्रबोधन घडवून आणण्याचा हा उपक्रम

पान 3 वर

रोजंदारी मजदुर सेनेच्या दणक्याने कंत्राटी कामगारांची दिवाळी गोड-गौतम आगळे सर



परळी (प्रतिनिधी) दिं8 कंत्राटी कामगारांचे थकीत वेतन दिवाळीपूर्वीच अदा करण्यात यावेत अन्यथा शनिवार दिनांक 7 नोव्हेंबर 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर धरणे आंदोलन तर परळीचे कंत्राटी कामगार नगराध्यक्षा यांच्या घरासमोर काळी दिवाळी साजरी करणार असा इशारा संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी दिला होता.

या बाबत सविस्तर वृत्त असे की मा. जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना संघटनेच्या वतीने दिनांक 26 ऑक्टोबर 2026 रोजी एक निवेदन सादर केले होते त्यात दिवाळी अगोदर कंत्राटी कामगारांचे थकीत वेतन अदा करण्याची विनंती केली होती.

जिल्हा सह आयुक्त नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी सदरिल निवेदनाची दखल घेऊन जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात कंत्राटी कर्मचारी यांचे थकीत वेतन दिपवाळी पूर्वी किमान वेतन दराने अदा करावे तसेच त्यांची तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी असे नमूद केले होते.

त्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत च्या अधिनस्त घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, अग्निशामक

पान 3 वर

दिवाळीत पूजली जाणारी लक्ष्मी! पण ती घडविणारे हातच आर्थिक संकटात;

केरसुणी कारागिरांसमोर व्यवसाय टिकविण्याचे आव्हान



गेवराई : दिवाळीच्या लक्ष्मीपूजनात लक्ष्मीचे प्रतीक मानून ज्या केरसुणीचे श्रद्धेने पूजन केले जाते, ती केरसुणी तयार करणाऱ्या कारागिरांच्या घरात मात्र आर्थिक अडचणींचे सावट आहे. बदलती जीवनशैली, प्लास्टिकच्या झाडूंचा वाढता वापर आणि आधुनिक स्वच्छता साधनांमुळे पारंपरिक केरसुणीची बाजारपेठ दिवसेंदिवस कमी होत आहे. पिढ्यान्पिढ्या या व्यवसायावर उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांसमोर आता आपला पारंपरिक व्यवसाय टिकविण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. दिवाळी जवळ आली की घराघरांत स्वच्छतेची लगबग सुरु होते. अंगणापासून उंबरठ्यापर्यंत आणि घराच्या कानाकोपऱ्यापर्यंत स्वच्छता

पान 3 वर

दोन टप्प्यांत 12 शाखांचा झंझावात; हनुमंत तोंडे यांच्या नेतृत्वाखाली आता बीड जिल्ह्यात प्रहारचा एल्गार!



किल्ले धारूर/प्रतिनीधी/ किल्ले धारूर तालुक्यात प्रहार संघटनेच्या शाखा विस्तार अभियानाने मोठी मजल मारली असून, दिवाळीच्या मुहूर्तावर आस्वला येथे बाराव्या शाखेची स्थापना उत्साहात करण्यात आली. मा. हनुमंत तोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नारळ फोडून शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी दिव्यांग बांधवांची सदस्य नोंदणी करण्यात आली.

मा. बच्चूभाऊ कडू यांच्या विचारांनी प्रेरित होऊन दोन टप्प्यांत 12 शाखांची स्थापना करत प्रहारने संघटनात्मक ताकद

पान 3 वर

"आजोबा, मला कपडे घ्या ना..." श्रेयाचा हट्ट अपुराच राहिला; कापूस विकून परतताना भीषण अपघात

दोन भावांसह नातीचा मृत्यू




कडा : दिवाळीच्या पूर्वसंध्येला आनंदाच्या क्षणांवर दुःखाचे सावट पसरवणारी हृदयद्रावक घटना शनिवारी घडली. आष्टी तालुक्यातील केळसांगवी येथील पडोळे कुटुंबातील तिघांचा मिरजगावजवळील बाभळगाव येथे झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झाला. सुदाम मारुती पडोळे (वय 55), देविदास मारुती पडोळे (वय 55) आणि श्रेया विशाल पडोळे (वय 10) अशी मृतांची नावे आहेत. या घटनेमुळे केळसांगवी गावासह संपूर्ण परिसरात तीव्र शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केळसांगवी येथील पडोळे कुटुंबातील सदस्य कापूस विक्रीसाठी मिरजगावजवळील बाभळगाव येथील जिनिंगवर गेले होते. कापूस जिनिंगवर

पान 3 वर

दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षांची तारीख जाहीर, पहिला पेपर कधी? जाणून घ्या वेळापत्रक



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-मार्च 2027 मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या बारावी आणि दहावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर केलं आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण 9 विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च 2027 मध्ये इयत्ता बारावी आणि दहावीच्य लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित केल्या जाणार आहेत. बारावीची लेखी परीक्षा ही 8 फेब्रुवारी रोजीपासून सुरु होईल. तर दहावीची लेखी परीक्षा 15 फेब्रुवारीपासून सुरु होईल. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी-मार्च 2027 मध्ये परीक्षा आयोजित केल्या जाणार आहेत. या कालावधित घेण्यात

पान 3 वर

झेंडूच्या फुलांनी फुलविले शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू!

लक्ष्मीपूजनाला परभणीच्या बाजारपेठेत फुलांना चांगला भाव; दुपारी किलोमागे 80 ते 100 रुपयांपर्यंत दर



परभणी | प्रतिनिधी : अनंत कोरे दुष्काळाचे सावट, शेतीमालाला मिळणारा कमी भाव आणि वाढता उत्पादन खर्च अशा संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी यंदाच्या दिवाळीत झेंडूच्या फुलांनी काहीसा दिलासा दिला आहे. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी परभणीच्या बाजारपेठेत झेंडूच्या फुलांना मोठी मागणी निर्माण झाल्याने दरात वाढ झाली. दुपारी दोन वाजेच्या सुमारास झेंडूच्या फुलांचा भाव किलोमागे 80 ते 100 रुपयांपर्यंत पोहोचला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू फुलले.

लक्ष्मीपूजनाच्या पूर्वसंध्येला परभणी बाजारपेठेत झेंडूच्या फुलांचे दर किलोमागे 40 ते 50 रुपये होते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळी सुरुवातीला काही प्रमाणात दरात घसरण झाली होती. मात्र, सकाळी 11 वाजेनंतर फुलांच्या मागणीत वाढ होऊ लागली. दुपारी दोन वाजेपर्यंत झेंडूचे दर 80 ते 100 रुपये किलोपर्यंत जाऊन पोहोचले. मागणी आणि आवक यांचा समतोल राहिल्याने बाजारात फुलांना चांगला भाव मिळाल्याचे चित्र होते.

पान 3 वर

क्रांतीसूर्य सेवाभावी संस्थेच्या वतीने नागवंशी बुद्ध विहाराला बुद्धमूर्ती भेट; वडवणीत प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात संपन्न!

"मला मेल्यानंतरही जिवंत राहायचे आहे – बाबासाहेब साळवे



वडवणी प्रतिनिधी :भगवान गौतम बुद्धांचा शांती, करुणा, मैत्री आणि समतेचा विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, तसेच बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार अधिक व्यापक व्हावा, या उदात्त सामाजिक व धार्मिक भावनेतून क्रांतीसूर्य सेवाभावी संस्थेच्या वतीने वडवणी शहरातील नागवंशी बौद्ध विहाराला भगवान गौतम बुद्धांची मूर्ती भेट देण्यात आली. या बुद्धमूर्तीची प्राणप्रतिष्ठा धार्मिक विधी आणि मंगलमय वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

या सोहळ्याला भंतेजी विवेकानंद, प्रकाश खळगे सर, यांच्यासह विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भंतेजी विवेकानंद आणि प्रकाश खळगे सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत भगवान बुद्धांच्या विचारांचे महत्त्व विशद केले. बुद्धांचा धम्म हा केवळ उपासनेपुरता मर्यादित नसून तो मानवतेला दिशा देणारा, माणसाला माणूस म्हणून जगण्याची शिकवण देणारा आणि समाजात समता, बंधुता व शांतता निर्माण करणारा जीवनमार्ग असल्याचे

पान 3 वर